# प्रेसनोट

दि. ०७/११/२०२४

**अँन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'ह' प्रभागातील पाणी मीटर निरीक्षक व कंत्राटी कॉम्प्युटर ऑपरेटर यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | दापोडी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ५८ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) विकास सोमा गव्हाणे, पद – पाणी मीटर निरीक्षक, (वर्ग-३)<br>२) श्रीमती आशा कानिफनाथ चौपाली,पद-कंत्राटी कॉम्प्युटर ऑपरेटर (इ.लो.से)<br>दोघे नेमणूक -'ह' प्रभाग कार्यालय, पिपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,६००/- (एक हजार सहाशे) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १,६००/- (एक हजार सहाशे) रुपये |
| पडताळणी दिनांक | ०७/११/२०२४ |
| सापळा दिनांक | ०७/११/२०२४ रोजी |
| ठिकाण | 'ह' प्रभाग कार्यालय, पिपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. अमोल भोसले, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९५२७३१७५२७) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे पाणीपट्टी बिल सरासरी काढले जात होते. ते नियमितपणे म्हणजे जितका वापर होईल तितके बील काढण्यासाठी लोकसेवक विकास गव्हाणे यांनी स्वतःसाठी १,०००/- रुपये व इतर लोकसेवक क्र. २ श्रीमती आशा चौपाली यांच्यासाठी ६००/- रुपयाची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या प्राप्त तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता, इतर लोकसेवक क्र. २ आशा चौपाली कंत्राटी कामगार, संगणक ऑपरेटर यांनी तक्रारदार यांच्या पाणीपुरवठयाचे बील नियमित करुन देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे स्वतःसाठी ६००/- रुपये व लोकसेवक क्र. १ विकास गव्हाणे यांच्याकरीता १,०००/- रुपये अशी एकुण १,६००/- रुपये लाच रक्कम मागणी करुन, इ.लो.से. क्र. २ आशा चौपाली यांनी तक्रारदार यांचेकडून १,६००/- (एक हजार सहाशे) रुपये पंचासमक्ष स्विकारले असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

त्यानंतर इ.लो.से. क्र. २ आशा चौपाली यांनी लोकसेवक क्र. १ विकास गव्हाणे यांना त्यांच्यासाठी तक्रारदाराकडून स्विकारलेल्या लाच रक्कमेबाबत फोनवरुन विचारले असता, लोकसेपक क्र. १ विकास गव्हाणे यांनी त्यांच्यासाठी स्विकारलेली १,०००/- रुपये लाच रक्कत इ.लो.से. क्र. २ आशा चौपाली यांचेकडे ठेवण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने, त्या दोघांविरुद्ध दापोडी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

7/11/24

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner